**राज्य अभिलेख देखभाल अभिकरण**

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना,

संचालनालय लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य

पहिला मजला, कुशेष मॅन्शन, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई. ४०० ००१

दूरध्वनी क्र.- ०२२ २२०२२३८१/२०४५/२०५३/३४९०/२१९८ ईमेल- dd.dcps@mahakosh.in

क्रमांकः- राअदेअ-२०२१/DDO LOGIN/ 440 दिनांक- 08/07/2021

प्रति,
असिस्टंट मॅनेजर,
मे. एनएसडिएल,
पहिला मजला, टाईम्स टॉवर,
कमला मिल कम्पाऊंड,
सेनापती बापट मार्ग,
मुंबई-४०० ०१३

विषय- राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीवर कोषागार कार्यालय व आहरण व संवितरण अधिकारी यांना अतिरिक्त लॉग ईन उपलब्ध करून देणेबाबत.

संदर्भ- शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक अंनियो-२०२०/प्र.क्र.३७/सेवा-४, दि. ०४/१२/२०२०

महोदय/महोदया,

संदर्भाकिंत परिपत्रकान्वये राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीमधील सभासदांच्या माहिती मधील त्रुटी पूर्तता कालमर्यादेत करण्याचे शासनाने आदेश दिले आहेत. अधिदान व लेखा कार्यालय, कोषागार कार्यालये आणि आहरण व संवितरण अधिकारी यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीवर प्रत्येकी एक लॉग ईन उपलब्ध आहे. तथापि, काही मोठ्या कार्यालयांमध्ये मोठ्या संख्येने त्रुटी पूर्तता करणे प्रलंबित आहे व त्या त्रुटी कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी ज्यादाच्या लॉगईनची मागणी केली आहे.

आपणास विंनती करण्यात येते की, खालील नमूद कार्यवाहीनुसार आपणाकडे पत्र/ईमेल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांना फक्त त्रुटी पूर्ततेच्या कामासाठी २ महिने या कालावधीकरिताच अधिकचा लॉगईन आयडी उपलब्ध करून द्यावा.

१) राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीमधील त्रुटी पूर्ततेकरिता आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना अधिकच्या लॉगईनची आवश्यकता असल्यास त्यांनी अधिदान व लेखा अधिकारी/कोषागार अधिकाऱ्यामार्फत तशी विनंती करतील.
२) अधिदान व लेखा अधिकारी/ कोषागार अधिकाऱ्यांनी सदर विनंतीची शहनिशा करून त्यांच्या शिफारशीसह पत्र राज्य अभिलेख देखभाल अभिकरण यांना पाठवतील.
३) राज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालयाने त्याची नोंद घेऊन मे. एनएसडिएल यांना पाठवावे.

४) यानंतर मे. एनएसडिएल यांनी फक्त त्रुटी पूर्ततेच्या कामासाठी २ महिने या कालावधीकरिताच अधिकाचा लॉगईन आयडी संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना उपलब्ध करून द्यावा.

५) तसेच अधिदान व लेखा अधिकारी अथवा कोषागार अधिकारी यांना स्वत:च्या कार्यालयासाठी अधिकच्या लॉगईनची आवश्यकता असल्यास उपरोक्त नुसार कार्यवाही करावी.

आपला,

संचालक,
संचालनालय लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

१) उपसचिव (सेवा-४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) विभागीय सहसंचालक (सर्व), लेखा व कोषागारे.
३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, बांद्रा.
४) कोषागार अधिकारी (सर्व), जिल्हा कोषागार कार्यालय.
५) आहरण व संवितरण अधिकारी.